# नोगत

जगात अनेक क्रांत्या झाल्या आणि जगाने या क्रांत्यांमधून आपला मानसिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि वैज्ञानिक प्रगतीने सर्वांगीण मानवी विकास साधला आहे. या क्रांत्यांना आपण असे ओळखतो, जसे फ्रेंच राजकीय क्रांती, रशियाची राज्य क्रांती, इंग्लड किंवा पाश्चिमात्य राष्ट्रातील धर्मक्रांती, चीन जपानची आर्थिक क्रांती, जर्मन, अमेरिकेची वैज्ञानिक क्रांती, तसेच इस्लामिक क्रांती, श्वेत क्रांती, हरितक्रांती इत्यादी क्रांतीचा इतिहास आपल्या आज लक्षात येतो.

परंतु भारत देशात मात्र अशी एखादी संपूर्ण बदलाची क्रांती झाल्याचा इतिहास आपणास ज्ञात नाही. ४ हजार वर्षांपूर्वी भारतात आर्य ब्राह्मणांचे इराणमधून आगमन झाले आणि या आर्य ब्राह्मणांनी येथील द्रविड संस्कृती उद्ध्वस्त करून येथील मूळनिवासी शूद्रादि-अतिशूद्र यांना आपले गुलाम केले. त्यांना ३३ कोटी देवांच्या नादी लावून देव-देवळांच्या अज्ञानात ठेवून चातुर्वर्ण्य व्यवस्थेत जखडून ठेवलेले आहे. त्यांच्या या व्यवस्थेला चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे, श्रुती मनुस्मृती या धर्म ग्रंथांचा आधार आहे. हे धर्मग्रंथ शूद्रातिशूद्रांना वाचता येत नाहीत. ती ऐकण्याचा त्यांना अधिकार नाही. ते धर्मग्रंथ साक्षात ईश्वराने निर्माण केले, चातुर्वर्ण्य व्यवस्था ब्रह्मदेवाने निर्माण केली, जातिव्यवस्था जन्माधिष्ठित कर्मवादातून व दैववादामुळे अबाधित आहे. ती ईश्वराने निर्माण केल्यामुळे ती सनातन व अपरिवर्तनीय आहे. तिच्यात बदल होऊ शकत नाही. ती ईशप्रदत्त व नैसर्गिक आहे, म्हणून ती कोणालाही बदलता येत नाही. ती बदलण्याचा कोणालाही अधिकार नाही. अशा प्रकारची या धर्मग्रंथ व धर्मशास्त्रांची शिकवण व धर्मसंस्कार या धर्मग्रंथांतून सर्व चातुर्वर्णावर व जन्मजात जातीय व्यवस्थेवर आजपर्यंत लादले जातात.

या चातुर्वर्णाचे व जातीचे लोक जे की ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि अतिशूद्र एकूण जवळपास सहा हजार जातीचे लोक हे आपापला वर्ण, जन्मजात जातीच्या हक्क आणि कर्तव्याने बांधलेले लोक आहेत. ते हिंदू धर्मसंस्काराचे हक्क आणि कर्तव्याचे पालन इमानेइतबारे आजपर्यंत करीत आलेले आहेत. अर्थात या चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे, जातीयतेमुळे आपल्यावर काय चांगले व वाईट परिणाम झालेत याचे कोणाला काहीही वाईट वाटत नाही. कारण या चातुर्वर्ण्य व्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य तीन वर्ण हे फायदेमंद वर्ण आहेत. या वर्णव्यवस्थेत, ब्राह्मणवर्णास सर्वांत मोठे सन्मानाचे सर्व अधिकाराचे व सर्व ज्ञान-विद्या ग्रहण करण्याचे, ज्ञानार्जनाचे व शस्त्र, संपत्ती बाळगण्याचे, प्रतिष्ठेचे सर्वोच्च अधिकार प्राप्त आहेत. किंबहुना या चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा धर्मग्रंथाचा मुख्य सूत्रधार, धर्मगुरु, पुरोहित, धर्मप्रमुख हा ब्राह्मणच आहे. त्याखालील क्षत्रियास राजसत्ता, अर्थसत्ता, विद्या व शस्त्र धारण करण्याचा मानसन्मानाचा हक्क आहे. त्या दोन वर्णानंतर वैश्यांना अर्थसत्ता व्यापार ज्ञान आणि प्रतिष्ठेचा अधिकार आहे. या वर्णव्यवस्थेचा या तीन वर्णीयांनाच फक्त फायदा होतो. नुकसान काहीच होत नाही. परंतु शूद्रांना वरील तीन वर्णींची फक्त सेवा करण्याचा हक्क आणि अधिकार किंवा कर्तव्य आहे. त्यास धनसंचय करता येणार नाही. त्यास

ज्ञान शिक्षण घेता येणार नाही. त्यास व्यापार राजसत्ता नाही. शस्त्र बाळगण्याचादेखील हक्क नाही. त्याला फक्त वरील तीन वर्णीयांची मागील जन्मातील कर्माचे (पापाचे) फळ म्हणून ते फेडण्यासाठी हा जन्म मिळाला. ते पापाचे फळ नम्रपणे फेडणे म्हणजे आपण मुक्त होऊन पुढील जन्मी आपणास उच्च वर्ण मिळेल ही धर्माची शिकवण ध्यानात ठेवून शूद्र वर्णाचे पालन करणे हे धर्मपालन व धर्मकर्तव्य आहे, असे समजून धर्मनिष्ठ राहाणे म्हणजे या शूद्र जन्माचे सार्थक आहे.

हे चार वर्ण म्हणजेच सवर्ण आहेत. शूद्रानंतरचा अतिशूद्र चांडाळ अस्पृश्य वर्ग म्हणजे अवर्ण, हिंदू धर्माच्या चार वर्णाच्या बाहेरील, सवर्णाच्या धर्मवर्तुळाबाहेरील वर्ग, ज्याचा स्पर्श चालत नाही, ज्याची सावली चालत नाही, ज्यांची थोडीही जाणीव ठेवून कोणत्याच प्रकारची दखल घेतली जात नाही, ज्याची माणूस म्हणून त्याच्या अस्तित्वाची दखल घ्यायची नाही, असा जाणूनबुजून दुर्लक्षित ठेवलेला वर्ग, म्हणजे ज्याला धर्मग्रंथाच्या भाषेत फक्त अंत्यज, दस्यू, दास, चांडाळ, श्वापद, सोपाक, श्वान, हरिजन किंवा अस्पृश्य म्हणतात. म्हणजेच महार, मांग, ढोर, चांभार, भंगी, भिल्ल, आदिवासी, कैकाडी, पारधी, वड्डर, भटके इत्यादी ज्यांची फक्त धार्मिकदृष्ट्या उपेक्षाच करावी, तिरस्कार करावा, मानहानी करावी, असा अस्पृश्यवर्ग ज्या अश्पृश्य जातीची साधी दखलसुद्धा घेऊ नये किंवा त्यांच्याप्रती थोडीसुद्धा कोरडी सहानुभूती व्यक्त करू नये. तिरस्कार व द्वेषाने सतत उपेक्षाच करावी. अशा तिरस्करणीय जातीची हिंदू धर्मवर्तुळाबाहेरील टाकाऊ कचऱ्यासारखी किंमत केली आहे.

या उपेक्षित अस्पृश्य जातीची संख्यादेखील फार मोठी आहे. या जातींना कोणतेच स्थैर्य नाही, शिक्षण, धनसंपत्ती, सत्ता, प्रतिष्ठा आणि स्वत:च्या सुरक्षेसाठी शस्त्र बाळगणे यापासून या जाती वंचित तर आहेतच. पण आपण या हिंदू धर्म जाती वर्णव्यवस्थेत अत्यंत खालच्या खोल गर्तेत दबलेले आहोत. सवर्ण हिंदूचे गुलाम, मानसिक गुलाम आहोत याचेदेखील भान हजारो वर्षांपासून ते आजपर्यंत या जातींना आलेले नाही. असे हे बेभान व मदहोश झालेले शूद्रादी अतिशूद्र लोक उपेक्षित आहेत. ज्याप्रमाणे अपघाताने एखाद्या माणसाची स्मरणशक्ती नष्ट होते व तो आपले स्वत्व, अस्तित्व, सर्वस्व विसरून जातो तो भ्रमिष्ट अवस्थेत (कोमात) गेलेला असतो. अशी माणसे जिवंत असून निर्जीव जीवन जगतात. अशी ही उपेक्षित जातीची अवस्था येथील हिंदू धर्माच्या या चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे झालेली आहे. ही एक धर्मग्लानी आहे. ही बाब त्यांच्या अद्याप लक्षात आलेली नाही. ही एक फार मोठी मानसिक गुलामगिरी आहे. या मानसिक गुलामगिरीची, धर्मग्लानीची जाणीव या उपेक्षित जातीला करून देणे हे मानवतेचे प्रथम कर्तव्य आहे. ते धर्म कर्तव्य या पुस्तकाच्या महानायकाने केलेले आहे. या चातुर्वर्ण्य व्यवस्थेची ब्राह्मणी धर्मग्रंथाची, देवाची, देवळांची व दैववादाची कर्ममार्ग, ज्ञानमार्गाची ब्रह्मषड्यंत्ररूपी हिंदूधर्माची चिरफाड या थोर महात्म्यांनी चांगल्या प्रकारे केलेली आहे. हे ब्राह्मणाचे हिंदू धर्माच्या रूपाने षड्यंत्र आहे. हे षड्यंत्र सर्व उपेक्षित जातींच्या लक्षात यावे. आपल्या मानसिक गुलामीतून या सर्व जाती जागृत होऊन त्यांनी आपले नीतिमान संस्कारक्षम मानवी नवजीवन उन्नत करून जगावे आणि जगात

सर्वत्र नीतिन्यायाचे निर्मिकाचे राज्य यावे अशी त्यांची तळमळ होती. धर्म काय असतो? कशासाठी असतो? कसा असतो? कोणासाठी असतो? सत्य काय आहे? धर्माची आवश्यकता काय? आणि मानवी जीवनाचे सार्थक कशात आहे? याबद्दल महात्मा फुल्यांनी आयुष्यभर चिंतन मनन करून हिंदू धर्मरूपी ब्राह्मणी कपटकारस्थानाविरुद्ध उभी हयात संघर्ष केला. या संघर्षातील चिंतनातून मानवांनी मूर्तिपूजा, व्यक्तिपूजा, नाकारुन बहुईश्वरवाद, लाथाडून, एका निर्मिकाचे भय मनी बाळगून एकमेकांशी बंधुभावाप्रमाणे सत्यधर्माने वागावे हा निष्कर्ष काढला. त्यांच्या या धर्मसंघर्षामुळे भारतात आजपर्यंत न झालेल्या धर्मक्रांतीचे बीजारोपण झाले आहे. पुढील २०-२५ वर्षांत तथाकथित कल्पित हिंदू धर्माविरुध्द निश्चितच धर्मक्रांती झाल्याशिवाय राहाणार नाही. आज या उपेक्षित, अडाणी, अज्ञानी जातींना धर्माची, नीतिमत्तेची फारच आवश्यकता आहे. ही आवश्यकता कशी पूर्ण होईल? धर्म हा मानवाच्या सर्वांगीण उन्नती व विकासाची सांस्कृतिक नीतिमूल्य, करूणा आणि ज्ञानाची गुरुकिल्ली आहे. परंतु त्याचे महत्त्व व आवश्यकता या गुलाम मानसिकतेच्या धर्मग्लानीत गेलेल्या अडाणी, उपेक्षित, शूद्रातिशूद्रांना, अस्पृश्यांना कसे कळणार? कधी पटणार? हे कळण्यासाठी त्यांना इतिहासाचे, समाजशास्त्राचे, अर्थशास्त्राचे, राज्यशास्त्राचे नंतर धर्मशास्त्राचे पहिलीपासूनचे धडे द्यावे लागतील. म्हणजे वर्ग पहिलीपासून ते किमान १२वीपर्यंत जो विद्यार्थी ज्ञानार्जन करून पदवी व नंतर पदव्युत्तराचे शिक्षण अध्ययन करतो. स्वत:च्या पायावर उभे राहून पुढील पायरीवरून नव ज्ञानदृष्टीचे तात्त्विक, सैद्धान्तिक, व्यावहारिक आणि आचरणाचे धडे शोधण्याचा प्रयत्न करतो व ते आचरणात आणण्यासाठी धडपडतो, संघर्ष करतो. अगदी त्याचप्रमाणे महात्मा फुलेंनी गुलामगिरीपासून 'शेतकऱ्यांचा आसूड' ते 'सत्यधर्मा'पर्यंत जी मांडणी केलेली आहे, ती त्यांच्याच भाषेतील सार रूपाने या सामान्य व उपेक्षित जातीपर्यंत पोहोचवावी या प्रामाणिक हेतूने 'भारतीय धर्मक्रांतीचे प्रणेते' हे पुस्तक प्रसिद्धीस आणले आहे. या ठिकाणी काही वेगळा नवा शोध किवा विचार मांडायचा नाही. कारण महात्मा फुल्यांचे समग्र वाङ्मय तर शासनाने प्रसिद्ध केलेलेच आहे. परंतु एवढा मोठा ग्रंथ सामान्य जनाला व सामान्य कार्यकर्त्याला सतत जवळ बाळगणे शक्य होत नाही. म्हणून त्यांच्या विचाराचा प्रचार व प्रसार व्हावा तसा झाला नाही. करिता महात्मा फुलेच्या तात्त्विक मांडणीचे एक छोटेखानी पुस्तक व तेही स्वस्त दराने कार्यकर्त्यांजवळ सतत राहावे, त्यांचे सार्वजनिक वाचन व्हावे व अडाणी-उपेक्षित समाजास ते चटकन समजावे व समजूनउमजून तो धर्मक्रांतीस तयार व्हावा. म्हणून हे पुस्तक ना नफा ना तोटा या तत्त्वावर प्रसिद्ध केले आहे, त्याचे स्वागत होईल ही अपेक्षा!

– बी एस कांबळे, पाथरीकर

प्रजेचा व आपला बचाव करण्यापुरती करपट्टी रयतेपासून घेणे, हे राजाचे कर्तव्यकर्म होय. याला धर्म कोणी म्हणावा?

यशवंत प्र.:- वसूल केलेली करपट्टी रयतेच्या सुखाकरिता न खर्च करिता केवळ निरोपयोगी धूर्त आर्यभट्टाचे पालणपोषण करून आपल्या स्वत:च्या ऐषआरामासाठी तिचा उपयोग केल्यापासून परिणती काय होणार आहे?

जोतीराव उ.:- तसे केल्यामुळे अनेक राजेरजवाड्यांची खानेखराबी होऊन ते धुळीचे दिवे खाऊन वाया गेले व पुढेहि त्याचप्रमाणे नि:संशय लयास जातील.

यशवंत प्र.:- मुलीमुलांनी आपल्या आईबापांची आज्ञा पाळणे हा पण त्यांचा धर्म नव्हे काय?

जोतीराव उ.:- जन्मताच आपण जेव्हा तान्ही बाळे असून अशक्त व पंगू होतो, तेव्हा आपल्या जन्मदात्या आईबापांनी आपले पालणपोषण करून आपणांस सुशिक्षण दिले; हे त्यांचे आपल्यावर अनंत अनिवार उपकार होत. त्याचप्रमाणे जेव्हा आपले जन्मदाते वृद्धापकाळामुळे अशक्त व पंगू होतात, तेव्हा आपण सर्व मुलीमुलांनी कृतज्ञतापूर्वक मोठ्या आवडीने त्यांचे पालनपोषण करावे; व त्यांचे उतराई झाल्याशिवाय पितृबाळकांमध्ये देवघेवीचा व्यापार संपत नाही.

यशवंत प्र.:- यावरून अशक्य व पंगू जन्मदात्या मातापित्यांचे पालणपोषण करून त्यांचे उतराई झाल्याशिवाय, स्त्रियांचा त्याग करून बाळब्रह्मचारी व ताबूतांतील सोंगासारखे सर्व अंगाला राख फासून आईतखावू बैरागी कसे बनतात? याविषयी तुमचे कसे काय मत आहे?

जोतीराव उ.:- याविषयी स्त्रियांचा त्याग करून बालब्रह्मचाऱ्यांचे व बैराग्याचे नऊ महिने उदरी ओझे वागविणाऱ्या त्यांच्या जन्मदात्यास विचारा, म्हणजे त्या तुम्हास व्यवस्थित उत्तरे देतील; परंतु यदाकदाचित् पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एकंदर सर्व स्त्री-पुरुषांनी मुक्ती मिळविण्याच्या लालचेने बाळब्रह्मच्यारी, बाळब्रह्मचारीणी, बैरागी व बैरागिनी या सर्वांनी थेट साधुसाध्वीणींची सोंगे घेऊन रात्रंदिवस कल्पित सनातन शेषशायींचे नामस्मरण करीत बसल्याने त्या सर्वांचा, उपासाने दोन-चार महिन्यांच्या आत खप होऊन ते सर्व लयास जातील, कां नाही बरे? कारण त्या सर्वांस कोणाच्याहि जीवावर आपला निर्वाह करून घेण्याचे साधन मुळीच राहत नाही. सारांश चाकराने धन्याची चाकरी करण्याचे उद्योगास चाकराचा धर्म म्हणतात. वेश्येने तरुणास नादी लावण्याच्या उद्योगास पात्रेचा धर्म म्हणतात. आर्यभट्टाने शूद्रादि अतिशूद्रास नीच मानणे यांस आर्यांचा धर्म म्हणतात. आर्यभट्ट ब्राह्मणांचा भिक्षा मागण्याचा धंदा असून त्यास भट्टांचा धर्म म्हणतात. असे धर्म शब्दाचे नाना प्रकारचे अर्थ होत असल्यामुळे, धूर्त भट्ट ब्राह्मण आपली कार्ये साधून घेण्याकरिता जशी वेळ येईल तसा त्याचा अर्थ करून आपले हित करून घेतात.

यशवंत प्र.:- आपल्या सर्वांचा निर्माणकर्ता व त्याने निर्माण केलेले मानवप्राणी

